**BDC LIBRARY**
**News Paper Clipping**
**A.Y. 2025-26**

# शनिवारपासून तीन दिवस 'पाटण महोत्सव'

वार्ताहर
पाटण

येथील कोयना एज्युकेशन सोसायटी, बाळासाहेब देसाई कॉलेज (आयक्यूएसी) आणि रोटरी क्लब, पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने येथील हॉटेल मॅनेजमेंटच्या क्रीडांगणावर शुक्रवार २८ ते २ मार्च या कालावधीत 'पाटण महोत्सव' चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात शेतकरी, उद्योजक तसेच नागरिकांसाठी शेती, उद्योग, नवउर्जा व स्थानिक उत्पादनांचे एकाच ठिकाणी प्रदर्शन व खरेदी-विक्री होणार आहे. 'पाटण महोत्सव' नव उद्योजकांना व्यासपीठ ठरणार असल्याची माहिती कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण यांनी दिली.

या महोत्सवात भात, नाचणीसह विविध धान्यांचे प्रदर्शन तसेच थेट विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. सुधारित बियाणे, सेंद्रिय शेती, काढणी पश्चात प्रक्रिया आणि बाजारपेठेतील उपलब्ध संधीबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. शेतकऱ्यांना उत्पादनांची थेट विक्री करता येणार असल्याने मध्यस्थांचा खर्च कमी होऊन उत्पन्नवाढीचा मार्ग खुला होणार आहे. आधुनिक शेती अवजारे, लघुउद्योगांतील नवीन्यपूर्ण उत्पादने आणि सौरऊर्जा यांचे सादरीकरण होणार आहे.

यावेळी महिला बचत गटांनी तयार केलेली हस्तकला, घरगुती प्रक्रिया-उत्पादने, मसाले, पापड, लोणची यांसह विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री येथे होणार आहे. स्थानिक चवीचे खाद्यपदार्थ नागरिकांना चाखायला मिळणार असून दर्जेदार स्थानिक उत्पादनांना थेट बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. नागरिकांनी या लोकाभिमुख उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

शेती, उद्योग, नवऊर्जा, स्वयंरोजगार या सर्व घटकांना एकत्रित करून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे हा उद्देश आहे. माहिती-तंत्रज्ञान तसेच बाजारपेठ यांचा सेतू उभारून शेतकरी व उद्योजकांचे उत्पन्न वाढवणे तसेच नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार स्थानिक उत्पादने उपलब्धता करून देणे यातून शेती, उद्योग तसेच स्थानिक उत्पादनांचा भव्य संगम ठरणार आहे.